आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यात नवी दिल्लीत चर्चा

- राज्यातल्या नागरिकांना राज्य सरकारच्या सुमारे ५०० सेवा व्हॉट्सअपद्वारे मिळणार

- स्वारगेट बस स्थानकातल्या बलात्कार प्रकरणातल्या आरोपीला पुणे पोलिसांकडून अटक

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चहापानापर्यंत केरळच्या ६ बाद २९८ धावा

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात वर्ष अखेरपर्यंत मुक्त व्यापार कराराला अंतिम स्वरुप दिलं जाईल, अशी आशा युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी व्यक्त केली आहे.  नवी दिल्लीत एका कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी चर्चा केली. यावेळी भारत-युरोपियन संघ यांच्यात धोरणात्मक भागीदारीला नवीन चालना देण्याबाबत त्यांच्यात चर्चा झाली. युरोपियन युनियन भारतासोबतचा आपला व्यापार विस्तारायला उत्सुक असून प्रस्तावित मुक्त व्यापार करार दोन्हींमध्ये आर्थिक सहभागात लक्षणीय वाढ करेल असं मत लेयन यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. जिज्ञासा ही विज्ञानाची जननी आहे. विज्ञान आणि ज्ञान एकत्रितपणे प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी उपयोगी येत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर एका पोस्ट मध्ये म्हटलं आहे.  मुंबईत TIFR, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात आज राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होत आहे. यानिमित्त विविध प्रयोग, प्रदर्शनं, प्रयोगांची प्रात्यक्षिकं, खेळ, कोडी, प्रश्नमंजुषा, अशा विविध सत्रांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या मेटा या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्सॲप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या ५०० सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सॲपवर मिळणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबई टेक वीक २०२५ या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते 'गव्हर्निंग द फ्युचर - एआय अँड पब्लिक पॉलिसी' या विषयावर बोलत होते.

एनपीसीआय या जगातल्या सर्वात मोठ्या युपीआय पेमेंट गेटवे कंपनीचे जागतिक मुख्यालय मुंबईत सुरु केलं जाणार आहे. त्यासाठी आवश्यक जमीन कंपनीला हस्तांतरित केली जाणार असून त्याची कागदपत्रं आज कंपनीला सोपवण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

केंद्र सरकारनं नवीन फौजदारी दंड संहिता लागू केली आहे. शक्ती कायद्यातल्या अनेक तरतुदी त्यात समाविष्ट आहेत. त्यामुळं शक्ती कायद्याचं स्वरुप बदलून नवीन आणावा लागणार असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - देवेंद्र फडणवीस**

**<><><><><>**

राज्य शासनामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी एआयचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. शासनाच्या कृती आराखड्यानुसार होणाऱ्या कामांचा आढावा घेण्यासाठी मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. विविध विभाग आणि पातळीवर उत्कृष्ट काम करत असलेल्या १५ विभागांच्या कामांचं सादरीकरण यावेळी करण्यात आलं. नाविन्यपूर्ण काम केलेल्या अधिकारी आणि कार्यालयांचे कौतुक करून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं. यात मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, सातारा, छत्रपती संभाजीनगर, धुळे, जळगाव, चंद्रपूर, नागपूर या जिल्ह्यांमधली पोलीस कार्यालयं, महापालिका, जिल्हाधिकारी अशा विविध कार्यालयांचा समावेश आहे.

आराखड्यानुसार शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतर विभाग आणि जिल्हा पातळीवर झालेल्या कामांचं समीक्षण आणि मूल्यमापन केलं जाईल. त्या आधारावर उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना १ मे रोजी सन्मानित केलं जाईल, असं फडणवीस यावेळी म्हणाले. तसंच, ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विभागांची नकारात्मक दखल घेतली जाईल, असा इशाराही त्यांनी या बैठकीत दिला.

**<><><><><>**

भाषा टिकली तर संस्कृती टिकेल. म्हणून मुलांना मराठी बोलण्यासाठी, लिहिण्यास प्रेरित करावं आणि प्रत्येकानं किमान एक मराठी वृत्तपत्र घरी आणावं, असं आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काल राजभवनात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

आपल्या वर्तनातून मराठीचा अभिमान जागवणं, हीच खऱ्या अर्थानं माय मराठीची सेवा आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासात अमूल्य योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान

सोहळा काल  मुंबईतल्या गेट वे ऑफ इंडीया इथं पार पडला. त्या कार्यक्रमात ते काल  बोलत  होते. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार,  मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि मंत्री मंगलप्रभात लोढा हे देखील उपस्थित होते.

राज्य सरकार मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कटीबद्ध असून, त्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असं अजित पवार यावेळी म्हणाले. २०२४ या वर्षाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक दिवंगत रावसाहेब बोराडे यांना जाहीर करण्यात आला होता. नुकतंच त्यांच निधन झाल्यामुळे त्यांच्या कन्येनं या कार्यक्रमात हा पुरस्कार स्वीकारला. नामवंत प्रकाशन संस्थेसाठीचा  श्री. पु. भागवत पुरस्कार पुण्यातल्या ज्योत्स्ना प्रकाशन संस्थेला, डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ.रमेश सुर्यवंशी यांना तर मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार भीमाबाई जोंधळे यांना प्रदान करण्यात आला.

<><><><><>

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या विश्वस्त मंडळाने २०२४-२५ साठी कर्मचाऱ्यांच्या ईपीएफ ठेवींवर सव्वा ८ टक्क्यांचा व्याजदर कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. ही शिफारस केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. मंजुरीनंतरच व्याजाची रक्कम ईपीएफओ खात्यात जमा केली जाईल.

<><><><><>

पुण्यातल्या स्वारगेट बस स्थानक बलात्कार प्रकरणातला आरोपी दत्ता गाडेला आज पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी अटक केली. शिरूर तालुक्यातल्या कनाट गावातल्या ग्रामस्थांनी पोलिसांना मदत केली. त्याला आज न्यायालयात हजर केलं जाईल. हा खटला जलदगती न्यायालयात चालवणार असल्याचं पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज दुसऱ्या दिवशी चहापानापर्यंत केरळनं ६ गडी गमावून २९८ धावा केल्या. अद्यापही ते विदर्भापेक्षा ८१ धावांनी पिछाडीवर आहेत. आदित्य सरवटे आज ७९ धावांवर बाद झाला. चहापानासाठी खेळ थांबला तेव्हा कर्णधार सचिन बेबी ८२, तर जलज सक्सेना ११ धावांवर खेळत होता.

<><><><><>

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज लाहोरमध्ये ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना सुरू आहे. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या अलिबागच्या समुद्रात आज पहाटे एका मच्छिमार बोटीला आग लागली. घटनेची माहिती समजताच भारतीय नौदल, तटरक्षक डाळ आणि पोलिसांनी बचावकार्य सुरु करून या बोटीवर असणाऱ्या १८ जणांना सुखरूप किनाऱ्यावर आणलं.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान, ते के. पी. बी. हिंदुजा महाविद्यालयाच्या वार्षिक दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

धनगर समाजाने एसटी प्रवर्गात आरक्षण मागण्याऐवजी ओबीसी प्रवर्गातलं आरक्षण टिकवावं, असं ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. लातूर इथे ते

पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्यावरही टीका केली.

**<><><><><>**

नांदेड इथं आजपासून २ दिवसीय ग्रंथोत्सवाला सुरुवात झाली. आज सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यानिमित्त पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आलं असून विविध कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. नागरिकांनी ग्रंथोत्सवाचा लाभ घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**//<><><><><>//**